**ISSN No.2394-8426 with Impact Factor 2.254**

# वैदर्भीय कादंबरीकार पु.भा. भावे यांच्या स्वातंत्र्योत्तर साठपूर्व कादंबरीतील प्रेमविश्व

**डॉ. पवन मांडवकर**

प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ 445401

अध्यक्ष, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद

**सारांश**

वैदर्भीय लेखकांच्या कादंबरीचा उदय विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात झाला. स्वातंत्र्योत्तर साठपूर्व कालखंडात ना.रा. शेंडे, भाऊ मांडवकर, ग.त्र्यं. मांडखोलकर, पु.भा. भावे, पु.य. देशपांडे अशा अनेक नामवंतांनी कादंबरीक्षेत्र समृद्ध केले. स्वातंत्र्यप्राप्तीदरम्यानच्या काळात घडलेल्या विविध घटनांचे चित्रण कादंबऱ्यांमध्ये उतरले. या काळात कादंबऱ्यांनी करमणुकीवर, प्रेमावर, सामाजिक समस्यांवर व राजकीय घडामोडींवर अधिक जोर दिला. दर्जेदार लेखक म्हणून नावाजलेल्या पु.भा. भावे यांनी समाजातील विविध पातळीवरच्या वेगळ्या आणि हृदयभेदक प्रश्नांना आपल्या कादंबऱ्यांतून वाट मोकळी करून दिली. वास्तविक त्यांनी हाताळलेले विषय नवीन होते, असे म्हणता येणार नाही. तरी त्यांची वाचकांच्या मनाचा ठाव घेण्याची शैली अत्यंत प्रभावी ठरली. अपौरुषाच्या पत्नीची जीवघेणी कहाणी, तिची तडफड त्यांनी 'अकुलिना'मध्ये वर्णन केली. पत्र पद्धतीचा वापर करून त्यांनी कथानायक आपली संपूर्ण कहाणी मित्राला कळवत आहे, अशी रचना केली आहे. 'वर्षाव' ही एक भावनाप्रधान कादंबरी असून प्रथमपुरुषी निवेदन पद्धतीतून ती आकाराला आली. अठरा–वीसच्या वयातच जी होरपळली, वठली व आयुष्यातून उठली, त्या उद्ध्वस्त झालेल्या स्त्रीची मनविव्हल करणारी कथा म्हणजे 'वर्षाव'. नायिकेच्या मनावरील शरीरसुखासंबंधीचा ताण इतका असह्य होतो की ती निरुपायाने परपुरुषाकडे वळते. तिचा संपूर्ण संसार उद्ध्वस्त होतो. पु.भा. भावे यांच्या प्रेमविश्वात केवळ स्त्री–पुरुष नात्यांनाच स्थान आहे, असे नसून त्यात मानवतेच्या भूमिकेतून पशू–पक्षांनाही तितकेच महत्त्व आहे. प्रेमाचे विविध रंगीबेरंगी पैलू त्यांची लेखणी चितारत जाते. चिरतरुण विषय, असतात, वाचकांच्या मनाचा ठाव घेणारी शैली वाचकांच्या हृदयावर अधिराज्य गाजविते.

**बीजशब्द**

वैदर्भीय, स्वातंत्र्योत्तर, साठपूर्व, प्रेमविश्व, वर्षाव

## प्रस्तावना

विदर्भाचे ह.ना. आपटे म्हणून ओळखले जाणाऱ्या बा.सं. गडकरी यांनी 1909 मध्ये 'सुधारणेचा मध्यकाल' ही सामाजिक कादंबरी लिहून खऱ्या अर्थाने वैदर्भीय मराठी कादंबरीची सुरुवात केली. स्वातंत्र्योत्तर साठपूर्व कालखंडातील विविध प्रकारच्या कादंबऱ्यांमध्ये ना.रा. शेंडे, भाऊ मांडवकर, ग.त्र्यं. मांडखोलकर, पु.भा. भावे, पु.य. देशपांडे, वरखेडकर, मुक्तिबोध, उद्धव शेळके, दिनकर देशपांडे, महाजन, भोळे, टोंगो अशा अनेक नामवंतांनी कादंबरीलेखन केले आहे. पु.भा. भावे यांनी जे विविधांगी लेखन केले, त्यात त्यांच्या कादंबऱ्यांमधील प्रेमविश्वावर बऱ्यापैकी चर्चा झाली.

## विषय विवेचन

1947 ते 1960 या तपाच्या प्रारंभातील अतिशय महत्त्वाची राजकीय घटना म्हणजे भारताला मिळालेले स्वातंत्र्य. या स्वातंत्र्यप्राप्तीकरिता घडलेल्या विविध घटनांचे चित्रण या कालावधीतील कादंबऱ्यांमध्ये दिसते. स्वातंत्र्यानंतर निर्माण झालेल्या विविध समस्या लेखक चितारू लागले. विदर्भात ना.रा. शेंडे यांनी समाजसुधारणेवरील कादंबऱ्या लिहिल्या. भाऊ मांडवकरांनी प्रश्ननिष्ठ कादंबऱ्या लिहिल्या. माडखोलकरांच्या कादंबऱ्यांतून थोडे प्रेम, थोडे राजकारण दिसू लागले. वरखेडकरांच्या लेखणीने विभूतिपूजेला महत्त्व दिले. पु.य. देशपांडे दार्शनिक कादंबरीसाठी प्रसिद्ध झाले.

शरच्चंद्र मुक्तिबोधांनी सामाजिक संदर्भांनी कादंबऱ्या सजवल्या. शेळक्यांचे लेखन तर विविधांगी होते. दिनकर देशपांडे, मा.ना. भोळे, ना.के. महाजन, शरच्चंद्र टोंगो या मान्यवरांनीही वैदर्भीय कादंबरीक्षेत्रात मोलाची भर घातली.

स्वातंत्र्योत्तर साठपूर्व कालखंडातील कादंबऱ्यांनी करमणुकीवर अधिक जोर दिला गेला. पु.भा. भावे यांनी समाजातील विविध पातळीवरच्या वेगळ्या आणि हृदयभेदक प्रश्नांना आपल्या कादंबऱ्यांतून वाट मोकळी करून दिली. 'अकुलिना'च्या व्यथा, अपौरुषाच्या पत्नीची जीवघेणी कहाणी, तिची तडफड त्यांनी वर्णन केली. समाजात अगतिक झालेल्या व्यक्तींचा संघर्ष त्यांनी मांडला. समकालीन सामाजिक समस्या आणि पूर्वीपासून चालत आलेल्या सामाजिक समस्या या दोन्हींना समर्थपणे मांडण्यात भावे यशस्वी झाले आहेत. तसे बघितले तर त्यांचे विषय नवे नव्हते; परंतु अनुभव घेण्याची आणि वाचकांपर्यंत पोचविण्याची त्यांची संपन्न हातोटी वाचकांची मने सुन्न करून टाकणारी ठरली.

वाचकांच्या मनाची पकड घेण्याचे सामर्थ्य त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये होते. वेश्याकन्यांविषयी प्रेम अथवा आत्मीयता हा विषय वैदर्भीय कादंबरीला नवीन नव्हता. 'अकुलिना' (1951) करिता पु.भा. भावे यांनी हाच विषय निवडला होता. पत्र पद्धतीचा वापर करून त्यांनी कथानायक आपली संपूर्ण कहाणी मित्राला कळवत आहे, अशी रचना केली आहे. वैद्यकीय महाविद्यालयातील नायकाचे विद्यार्थी जीवन ते तो संसारी पुरुष किंवा डॉक्टर होईपर्यंतच्या कालावधीतील घटनांचे चित्रण यात असून भावनांची चढती कमान राखण्यात लेखक यशस्वी झाले आहेत.

प्रारंभी मित्राने दिलेला गुरुमंत्र प्रमाण मानून नायक स्त्रियांशी खेळत असतो. सुरंगा नावाची एक वेश्याकन्या नायकाच्या जीवनात येते आणि 'लग्नाचे मूल्य दिल्याशिवाय लग्नाचा लाभ' त्याला देते. आपले सर्वस्व नायकावर उधळते. मात्र तिचे प्रेम सफल होऊ शकत नाही. निराश होऊन ती नायकाच्या मार्गातून निघून जाते. परत जेव्हा तिची आणि नायकाची भेट होते, तेव्हा तो डॉक्टर झालेला असतो तर ती शरीरविक्रयामुळे सर्व संभावित रोगांनी ग्रस्त असते. तिच्या या अवस्थेला आपणच कारणीभूत आहोत, असे नायकाला वाटते. त्याच्यामध्ये अपराधीपणाची भावना येते. एव्हाना वेळ निघून गेलेली असते.

पत्रपद्धतीमुळे कृत्रिमतेच्या बंधनात अडकलेली, प्रारंभी थोडी उथळ वाटणारी, मात्र शेवट अत्यंत गंभीर असणारी ही भावपूर्ण कादंबरी वाचकांना अस्वस्थ करून सोडते, विचार करण्यास भाग पाडते.

ल.ग. जोग यांच्या मते ' 'अकुलिना' हा वाचकाला अमर्याद अस्वस्थ करून सोडणारा अनुभव आहे. ही दुसरी मनावस्था प्रभावी होत जाते व त्यामुळे कादंबरीचा दर्जा एकदम उंचावतो. ते शेवटचे आर्तपत्र, भावनेचा तो ओघ कधीच संपणार नाही असे वाटते. अपराधाचे प्रायश्चित्त मागत मधूचे प्रेम जसे भरकटत जाते तसे आपण मधूला एखादा मार्ग सुचवू शकू का या विचारात आपले मन भरकटत राहते. एखाद्या नायकाने वा वक्त्याने आपल्या कलेची कमाल उंची गाठून एकदम थांबावे म्हणजे जसा अनुभव येतो तसा येथेही येतो.'[1]

पु. भा. भावे यांची 'वर्षाव' ही 1958 सालची आणखी एक भावनाप्रधान कादंबरी. प्रथमपुरुषी निवेदन पद्धतीतून ती आकाराला आली. जिथून कथा सुरू होते, तिथेच तिची अखेरही होते आणि कथानकाचे एक हताश वर्तूळ पूर्ण होते. ओल्या आभाळातून जिच्यावर अग्निवर्षाव झाला, अठरा–वीसच्या वयातच जी होरपळली, वठली व आयुष्यातून उठली, त्या उद्ध्वस्त आयुष्याची मनविव्हल करणारी कथा म्हणजे 'वर्षाव' ही कादंबरी. ज्या देवाने तिच्याशी शतृत्व केले, त्या देवाशी झगडता झगडता, त्या प्रामाणिक, सदाचरणी, भाबड्या स्त्रीच्या आयुष्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या. एका ओंगळ, घाणेरड्या माणसाची गळ्याात गळा घालून आयुष्य व्यतीत करण्याचे दुर्भाग्य वाट्याला आल्याने त्या सुंदर सुकुमार सत्चारित्र्याची होळी झाली.

लेखक किंवा नायक कुसुम पेठे या विवाहित तरुणीच्या संबंधात 'चार पुरुष जसे वागतात' तसे वागताना दिसत नाहीत. हा त्यांचा भेकडपणा किंवा दुबळेपणा निश्चितच नाही. ज्या उच्च आदर्शाची त्यांनी जोपासना केली, त्या आदर्शाचे दृश्यरूप म्हणजे त्यांचे वागणे. पेठे वकिलांची तरुण, सुंदर पत्नी नायकाकडे आकर्षित झाली, यात तिचाही दोष नाही. ती स्त्रीला पुरुषाविषयी असणारी नैसर्गिक ओढ होती आणि पेठे वकील पुरुष नव्हते. पतीच्या पौरुषहीनतेतूनच

तिची हृदयभेदक शोकांतिका जन्माला आली. पतीबद्दल ती म्हणते, ''पण त्यांना लग्न करायचं काही कारण नव्हतं. तरीही त्यांनी लग्न केलं. माझा गळा कापला. त्यांना वाटलं ते त्यांनी केलं, त्यांनी एवढं पाप पेरल्यावर तिथून मी तरी आता पुण्याचं पीक कसं काढू?''[2]

तिचा हा वाममार्ग योग्य आहे का असा प्रश्न नायकाच्या संस्कारी मनाला पडतो. मात्र आपले मन मोकळे करताना ती ज्या शब्दांत बोलते, त्यावरून तिच्या अगतिकतेची कल्पना येते. हा वाममार्ग तिने शरीराच्या स्वाभाविक मागणीतून स्वीकारला. तरी ती बाब तिला सतत टोचत राहते. नायकाला ती विचारते, “खरंच मी पापी आहे का हो? कुंती पापी होती का? शकुंतला पापी होती का?”[3] तिच्या या वक्तव्यावरून ती अनिच्छेनेच हा व्यवसाय करते आहे, हे लक्षात येते. पाप करण्याची तिची इच्छा नाही, तिच्या मनाचा तो धर्म नाही; परंतु नियतीने तिचा सरळ जीवनाचा मार्ग बंद करून टाकला आहे. शिवाय तिच्या सळसळत्या तरुण शरीराच्या नैसर्गिक गरजा पूर्ण व्हाव्यात, हीदेखील तिची रास्त अपेक्षा आहे. म्हणूनच ती नायकाला प्रश्न करते, “बाईला एक नवरा तरी धड असावा की नाही?..... का जिला नुसता नावाचाच नवरा आहे? तिने आपलं अहिल्या, द्रौपदीचं स्मरण करावं आणि जोगिणीसारखं राहावं? का राहावं तिनं जोगिणीसारखं? कसं राहावं?”[4] असे प्रश्न विचारणारी स्त्री चंचल, उथळ मनाची नाही, तर लेखकाच्या मते ती चारित्र्यशालीच आहे. तिच्या वागण्याबोलण्यात जो प्रांजळपणा आहे, त्यावरून तिला वाईट चालीची म्हणण्यास वाचकही धजावत नाहीत. करुणेशिवाय अन्य भावना तिच्याविषयी वाचकांच्या मनात निर्माण होत नाही. परिस्थितीच्या तणावाखाली ती सतत वावरते. पौरुषहीन पतीचा स्पर्श तिला नकोसा होतो. तो मात्र निरर्थक तिच्या अंगझटीला येत असतो. लेखकाजवळ ती म्हणते, “तोच त्यांचा छंद आहे. ज्या गावाला कधी जाता येत नाही, त्याची ते वाट विचारीत असतात. जाता येता ते मला खेटतात – त्यांचा तो स्पर्श मला अगदी सोसत नाही. त्यांचा स्पर्श झाला म्हणजे मला वाटतं की माझ्या अंगावर गटार सांडलं. असा मेलेला घाणेरडा स्पर्श झाल्यावर कसं वाटतं ते शब्दांनी सांगून कळायचं नाही. पण अंग अंगाला लागलं म्हणजे मला वाटतं की माझं शरीर घाणीत माखून निघालं, डागाळलं, मी मळून गेले. आणि मग तो ओकारी आणणारा स्पर्श पुसून टाकण्यासाठी मला तुमच्याकडे धावत यावंसं वाटतं. याला तुम्ही पापच म्हणाल का?”[5]

तिच्या बोलण्यात स्पष्टवक्तेपणा आहे. प्रांजळपणा आहे. एखाद्या उपाशीतापाशी भिकारणीप्रमाणे पदर पसरून जेव्हा ती नायकाकडे एकादाच अंगसंगाची मागणी करते, तेव्हा तिच्याविषयी साहजिकच दयाभाव निर्माण होतो. त्यामागे आणखी एक कारण म्हणजे लेखकाने तिच्या मनाच्या कोंडमाऱ्याचे वर्णन अत्यंत ताकदीने केले आहे. असह्य भावनांचा ताण जितका कुसुमच्या आणि नायकाच्या मनावर कादंबरीभर जाणवतो, तितकाच तो वाचकांच्या मनावरही होतो. हा ताण इतका असह्य होतो की ती ज्याचा तिरस्कार करते, त्या दाबकेकडे निरुपायाने ती वळते आणि त्याला सर्वस्व अर्पण करून त्याचा अंकुर पोटात वागवते. मात्र याची भयानक किंमत तिला मोजावी लागते. तिचा संपूर्ण संसार उद्ध्वस्त होतो. नैसर्गिक गरजेच्या पूर्ततेची ही किंमत पाहून वाचक स्तंभित होतात. या कादंबरीवरील ग.दि. माडगूळकरांची प्रतिक्रिया अत्यंत बोलकी आहे. त्यांनी भाव्यांना कळविले की, “दिवाळी अंकातली तुमची 'वर्षाव' कादंबरी सर्वप्रथम वाचली. कादंबरी एकदम उत्तम साधली आहे. विषय फारच नाजूक होता. तो तुम्ही म्हणून पचविला. कादंबरीतील 'मी' एकदा तरी पेठीणबाईला प्राप्त व्हावा, असे वाचकांना वाटत राहते. तिचे स्वभावचित्र सहानुभूती खेचून घेते, तिच्या बाबतीत नायक घसरला असता तर वाचकांची मने मोहरली असती. नीतिवादाची कास तुम्ही अखेरपर्यंत सोडली नाही व नायकाचे पात्र वरवर अलौकिक वाटले तरी तुमच्या शैलीने तुम्ही त्याला माणूस केला आहे. मराठी वाङ्मयात हा विरळा नायक तुम्ही जन्माला घातला आहे. पेठे विधिज्ञाच्या तोंडी 'होम डिपार्टमेंट' हा शब्द तुम्ही इतक्या वेळा योजला आहे की त्या शब्दाच्या पुनरुक्तीने पेठ्यांच्या स्वभाववैचित्र्याचे नेमके उसनेपण वारंवार स्पष्ट होत जाते. कपाटामागून येणारी नायिका आणि काळ्याा कुत्र्याच्या गळ्याातील चिठ्ठ्याा थोड्याा 'फिल्मी' वाटतात, पण तो काही दोष नव्हे.”[6]

1960 नंतरच्या काही वर्षांत पु.भा. भावे यांनी मूलभूत प्रवृत्तींवर भर दिल्याचे लक्षात येते. 'मागं वळून', 'अडीच अक्षरे', 'जादूचे पाणी' या त्यांच्या नंतरच्या कादंबऱ्या. प्रेम, मग ते स्त्री पुरुषांमधील असो, पशु–पशूंतील असो किंवा

माणूस आणि पशूंमधील असो, जर मनःपूर्वक उत्कटतेने केले असेल तर त्यात अलौकिक सौंदर्य प्रगट होत असते. शरीरसुखाच्या लालसेने केलेले प्रेम हे प्रेमाचे एक अंग झाले. पण जिथे शरीर सौख्याची अपेक्षा असते, तिथेही प्रेमाची उत्कटता विलक्षण असते. लेखक आणि त्यांच्या मित्रांच्या अनुभवाला आलेल्या प्रेमाच्या वेगवेगळ्या छटा येथे रंगविण्यात आल्या आहेत. 'जादूचे पाणी' ही कादंबरी 1968 मध्ये प्रकाशित झाली तरी तिची कथा त्यापूर्वीच लेखकाच्या डोक्यात तयार झाली असावी. माणूस आणि पशू यांच्यातील मूलभूत प्रवृत्तींचाच शोध घेण्याचा प्रयत्न आहे. ज्यांना हिंस्र पशू म्हटल्या गेले व ज्यांच्यापासून दूर राहण्याची प्रवृत्ती असते, खऱ्या अर्थाने मवाळ प्रवृत्तीचे शांतताप्रिय, स्वजनांचा घात न करणारे असतात. उलट ज्याने मवाळपणाचा बुरखा पांघरलेला असतो, मुखाने शांतीचा, बंधूभावाचा घोष चालविलेला असतो, तो माणूस वेळप्रसंगी आपली हिंस्र वृत्ती दाखवतो. कादंबरीच्या अर्पणपत्रिकेत लेखक म्हणतात, "ज्याचे ठिकाणी प्रेम, निष्ठा, कृतज्ञता, शौर्य, दूरदृष्टी ह्यांसारखे अनेक बहुमूल्य गुण वास करीत आहेत, ज्यांच्यामुळे माणसांचे इहलोकीचे वास्तव्य बरेच सुखकारक झाले आहे, ज्यांचे उदाहरण गिरविल्यास माणसे अधिक माणसासारखी होतील, त्या अखिल श्वानजातीस प्रेमादरपूर्वक"[7]

एकंदरीत पु.भा. भावे यांच्या प्रेमविश्वात केवळ स्त्री–पुरुष नात्यांनाच स्थान आहे, असे नसून त्यात मानवतेच्या भूमिकेतून पशू–पक्षांनाही तितकेच महत्त्व आहे. प्रेमाचे विविध रंगीबेरंगी पैलू त्यांची लेखणी चितारत जाते आणि ही सिद्धहस्त  लेखणी वाचकांना गुंतवते, रमवते, विचार करण्यास भाग पाडते. त्यांचे विषय चिरतरुण असतात, शैली वाचकांच्या मनाचा ठाव घेते आणि साहजिकच त्यांच्या हृदयावर अधिराज्य गाजविते.

## निष्कर्ष

1. स्वातंत्र्योत्तर साठपूर्व कालखंडात वैदर्भीय कादंबरीक्षेत्रात स्वातंत्र्यापूर्वीच्या घटनांचे व समाजातील घडामोडींचे संदर्भ विपुल आहेत.
2. पु.भा. भावे यांनी समाजातील विविध पातळीवरच्या वेगळ्या आणि हृदयभेदक प्रश्नांना आपल्या कादंबऱ्यांतून वाट मोकळी करून दिली.
3. स्वातंत्र्योत्तर साठपूर्व कालखंडात 'अकुलिना' आणि 'वर्षाव' या दोन कादंबऱ्यांमधून भाव्यांनी रंगविलेले प्रेमविश्व अत्यंत उच्च पातळीवरचे व वेगळ्या वळणाचे असल्याने मराठी साहित्यात अधिक चर्चिले गेले.
4. पु.भा. भावे यांच्या प्रेमविश्वात केवळ स्त्री–पुरुष नात्यांनाच स्थान आहे, असे नसून त्यात मानवतेच्या भूमिकेतून पशू–पक्षांनाही तितकेच महत्त्व आहे. प्रेमाचे विविध रंगीबेरंगी पैलू त्यांची लेखणी चितारते.

## संदर्भ


1. जोग ल.ग., **कादंबरी**, चिरंजीव ग्रंथ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 1963, पृ. 147–148
2. भावे पु.भा., **वर्षाव**, प्रथमावृत्ती, 1958, पृ. 108
3. **तत्रैव**
4. भावे पु.भा., **वर्षाव**, **उनि.** पृ. 112
5. भावे, पु.भा., **वर्षाव**, **उनि.** पृ. 114)
6. माडगूळकर, ग.दि., पु. भा. भावे एक पत्र सेतू, **तरुण भारत**, नागपूर, दि. 11 ऑगस्ट 1985
7. भावे पु.भा., अर्पणपत्रिका, **जादूचे पाणी**, कुळकर्णी ग्रंथागार, प्रथमावृत्ती, 1968